# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र  जिल्हा District: मुंबई  पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि  पहिली खबर क्र. FIR No.: ९८  वर्ष Year: २०२६  दिनांक Date: २८/०६/२०२६

2. (i) अधिनियम Act: भ्र. प्र. अधिनियम १९८८  कलमे Sections: ७
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: गुरुवार  तारीख पासून Date from: २६/०६/२६  वेळ Time: १६:४५  तारीख पर्यंत Date to: २८/०६/२६  वेळ Time: १९:४०

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००  (2) ०३.०० ते ०६.००  (3) ०६.०० ते ०९.००  (4) ०९.०० ते १२.००  (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.००  (7) १८.०० ते २१.००  (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.  तारीख Date: २६/०६/२०२६  वेळ Time: १५:०० वा.

(c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: ४७  तारीख Date: २८/०६/२०२६  वेळ Time: २३:४५

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी  लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.: दक्षिण ... कि.मी.  चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: M.T.N.L बिल्डिंग, पहिला मजला, माझगाव, मुंबई  ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: प्रमोद खुर्वे
(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: प्रकाश खुर्वे
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ३८ वर्षे
(d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय  फोन नं. Phone No.: ९६९६९४३...
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........
(f) व्यवसाय Occupation: नोकरी
(g) धर्म Religion: हिंदू  जात Caste: मराठा  जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता Address: ला.प्र.वि. मुंबई  गल्ली/सर्व्हे नं. Ward ........ घर/नाव नं. House Name No. ........ फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

संदिप रविराज खंबाट, वय ३८ वर्षे, पद- राज्यकर निरीक्षक, GST भवन, माझगाव, मुंबई

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025)

# फिर्याद

खालील फिर्यादी श्री. प्रमोद प्रकाश सुर्वे, पोलीस निरिक्षक, ला.प्र.वि. मुंबई यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर नोंद करण्यात आली असून तीस प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(महेश जाधव)
सहायक पोलीस आयुक्त
ला.प्र.वि. मुंबई

प्रमोद सुर्वे

फिर्याद

दिनांक १८/०६/२०२६

मी, प्रमोद सुर्वे, वय ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी ( पोलीस निरीक्षक ),नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मो.क्र. ९७६७५३१९४७

मी वरील प्रमाणे असून, दिनांक ११/०७/२०२३ रोजीपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे 'पोलीस निरीक्षक ' या पदावर नेमणूकीस आहे.

मी दिनांक १७/०६/२०२६ रोजी कर्तव्यावर असताना, मला व सहायक पोलीस आयुक्त श्री गंगाप्रसाद मुदीराज यांना मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांनी पडताळणी कारवाई क्र. ४३/२०२६ मध्ये एका तक्रारदाराची पडताळणी कारवाई करण्याचे आदेशीत केली. त्यावरुन माझी तपासी अधिकारी व स.पो.आ. गंगाप्रसाद मुदीराज यांची पर्यवेक्षक अधिकारी म्हणुन लेखी आदेश केल्याने नमुद पडताळणी मधील तक्रारदार श्री अनिलकुमार रामलखन यादव वय- ४९ वर्ष यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली, त्यांनी त्यांचा स्व:हस्ताक्षरात मराठीमध्ये तक्रार अर्ज लिहून तो अर्ज आम्हास वाचण्यास दिला. त्यांच्या तक्रारीची हकीकत अशी की,

तक्रारदार श्री अनिलकुमार रामलखन यादव वय- ४९ वर्ष, व्यवसाय- ट्रान्सपोर्ट, राहणार रुम न.६०४, महाकाली दर्शन, बि.न.१, आझाद रोड, अंधेरी ईस्ट मुंबई यांचा डी.एल. रोडलाईन्स, रिअल ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असुन त्यातुन मिळाणाऱ्या उत्पन्नावार कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात.

तक्रारदार हे मागील १२ वर्षापासुन ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करीत आहेत. त्यांच्या व्यवसायाचा जी.एस.टी. क्रमांक मिळण्याकरीता दि.०६/०६/२०२६ रोजी वस्तु व सेवाकर विभाग, माझगाव मुंबई येथे ऑनलाईन अर्ज दाखल केला होता.

दि.१६/०६/२०२६ रोजी मो.न.८९९९१६५९५४ या क्रमांकावरुन तक्रारदार यांचे मोबाईलवर एका इसमाचा कॉल आला. त्यावेळी त्या इसमाने त्याची ओळख जी.एस.टी. चे अधिकारी असल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांचे मोबाइलवरील ट्रु कॉलरवर संदीप खलाटे असे नाव आले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव संदीप खलाटे असे सांगितले. श्री संदीप खलाटे यांनी तक्रारदार यांस सांगितले की, तुम्ही तुमच्या व्यवसायाचे जी.एस.टी. क्रमांक मिळण्याकरीता ऑन लाईन द्वारे केलेला अर्जासंबधीत बोलत असल्याचे सांगुन तुमच्या व्यवसायचे पाच लाख पेनल्टी असल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी मी माझे सी.ए.कडे विचारणा करुन सांगतो असे सांगितले. त्यानंतर पुन्हा संदीप खलाटे यांचा कॉल तक्रारदार याना आला त्यावेळी तक्रारदार यांनी इतकी पेनल्टी देणे शक्य नसल्याचे सांगीतले. त्यावेळी संदीप खलाटे यांनी मी तुमची सेटींग करुन देतो असे सांगुन २५,०००/- रक्कम दयावी लागेल असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी इतकी रक्कम नसल्याचे सांगितले. त्यावेळी संदीप खलाटे यांनी १०,०००/- रक्कम आणुन देण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यानी तुम्हाला येवुन भेटतो असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार याना त्यांच्या व्यवसायाचा जी.एस.टी. क्र 27ADIPY1886D1Z3 प्रमाणे जनरेट झाला. त्यानंतर संदीप खलाटे यांनी तक्रारदार याना कॉल करुन १०,०००/- रक्कम घेवुन माझगाव येथील वस्तु व सेवाकर विभाग येथे बोलविले.

तक्रारदार श्री अनिलकुमार रामलखन यादव याची लोकसेवक संदीप खलाटे यांना रु.१०,०००/- लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने दिनांक १७/०६/२०२६ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष हजर होवून लाच मागणी करत असल्याबाबत स्व:हस्तलिखित तक्रार अर्ज दिला.''

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. दिनेश कावले यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री. सचिन बुधावले, वय ४५ वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - लिपीक टंकलेखक, उप प्रादेशिक परिवहन बोरीवली दहिसर पश्चिम मुंबई २) श्री स्वप्नील राजु उके, वय ३६ वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - लिपीक टंकलेखक - प्रादेशिक परिवहन विभाग, मुंबई मध्य तुळशीवाडी ताडदेव मुंबई यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर त्यांना तक्रारदार यांची

प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा स्व:हस्तलिखित तक्रार अर्ज पंचास वाचण्यास दिला. पंचांचा तक्रार अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून मी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सपोआ गंगाप्रसाद मुदीराज तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून मी सदरचा अर्ज माझे ताब्यात घेतला.

त्यानुसार आम्ही व दोन्ही पंच व तक्रारदार असे लाप्रवि कार्यालयातील तांत्रिक कक्षात गेलो. सदरवेळी तांत्रिक कक्षातील पो.ह. गायकवाड यांच्या मदतीने तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डर ची माहिती देवून पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षताबाबत सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर सूरु करुन माझे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे प्रथम वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर मी व सपोआ मुदीराज यांनी पंचासमक्ष सांगितले की, तक्रारदार हे लोकसेवकाची प्रत्यक्ष भेट घेण्याआधी त्यांना त्यांचे मोबाईल फोनवर कॉल करून भेटीचे वेळ व ठिकाण याबाबत विचारणा करणार आहेत.

त्यानंतर आम्ही पडताळणी पथकातील अधिकारी व अंमलदार व तक्रारदार श्री अनिलकुमार यादव असे ला.प्र.वि. ठाणे दैनदिनी मध्ये नोंद घेवुन १६.५० वाजता शासकिय वाहनाने लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता ला.प्र.वि. कार्यालयातुन रवाना झालो. आम्ही पडताळणी पथक शासकिय वाहनाने माझगाव कोर्ट येथील पार्कीग मध्ये जावुन थांबलो. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक श्री संदीप खलाटे यांस मोबाईलवर संपर्क करुन भेटीबाबत विचारणा करणार असल्याने पो.ह. गायकवाड यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू केला व तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. ९८२०५२४१३१ यावरून स्पीकर ऑन करून लोकसेवक श्री. संदीप खलाटे यांस त्यांचे मोबाईल नं. ८९९९१६५९५४ यावर नॉर्मल कॉल केला. सदरचा कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आला. नमुद संभाषणामध्ये तक्रारदार यांनी लोकसेवकास भेटण्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी वस्तु व सेवाकर विभाग कार्यालयाच्या गेट जवळ येण्यास सांगितले व फोन बंद केला.

त्यानंतर तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतील बाजुस बनीयानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन पंच न.०१ श्री सचिन बुधावले यांचे सोबत रवाना केले. काही वेळानंतर तक्रारदार व पंच न.०१ श्री सचिन बुधावले हे परत शासकीय वाहनाजवळ परत आले त्यावेळी आम्ही तक्रारदार याना लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

त्यांनतर पंच न.०२ श्री स्वप्नील उके यांचे समक्ष पंच न.१ श्री सचिन बुधावले यांचेकडे आम्ही काय घडले बाबत विचारणा केली असता, पंच श्री सचिन बुधावले यांनी सांगितले की, ते तक्रारदार यांचे सोबत लोकसेवक यांना भेटण्यासाठी पायी चालत वस्तु व सेवाकर विभाग, माझगाव मुंबई कार्यालयात गेले त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन लोकसेवक यांना कॉल केला. त्यांनी तक्रारदार यांना कार्यालयाच्या बाजुस असलेल्या महाराणा प्रताप यांच्या पुतळयाजवळ असलेल्या चहाच्या टपरीजवळ बोलविले. तेव्हा तक्रारदार व पंच हे चहाच्या टपरीजवळ गेले. त्यावेळी पुन्हा तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरून श्री संदीप खलाटे यांना कॉल केला त्यावेळी त्यांनी एक मिनीट मध्ये येतो असे सांगितले. काही वेळात एक इसम तक्रारदार यांचे समक्ष आले. तेव्हा पंच न.०१ यांना समजले की, लोकसेवक श्री संदीप खलाटे आहेत. त्यावेळी तक्रारदार व श्री संदीप खलाटे यांच्यामध्ये बोलणे चालु होते त्यावेळी तक्रारदार म्हणाले, **इधर हालत खराब है, अपनी। तो कुछ कम नही दे दु कितना आठ पाच त तक कर दु सर । तेव्हा लोकसेवक म्हणाले, नई, नई ऐसा नही होता है । तेव्हा तक्रारदार म्हणाले पुरा दस** तेव्हा लोकसेवक म्हणाले **पुरा दस,** तेव्हा तक्रारदार म्हणाले, आज तो सर हो भी नही पाऐगा फिर। असे बोलणे होत असतेवेळी तक्रारदार म्हणाले, **नही मै वो नही बोल रहा हु। जैसे मतलब कल पाचं हजार अलग से दे दिया। पांच हजार एक हप्ते का टाईम दे दिजिऐना सर। तेव्हा लोकसेवक म्हणाले, नही, नही ऐसा नही होता। ऐसा थोडी होता है। रहने दो देखते है। तेव्हा तक्रारदार म्हणाले,** ठिक है मै कल आता हु, बंदोबस्त करता हु। अ... कितना बजेतक आप

2

फ्रि रहेंगे सर। तेव्हा लोकसेवक म्हणाले, वैसे ही पाचं छे बजे। तेव्हा तक्रारदार म्हणाले जभी भी मै आ जाऊंगा आपको कॉल करता हु।

वरील तक्रारदार व लोकसेवक यांचे प्रत्यक्ष झालेल्या भेटीदरम्यान झालेल्या ध्वनिमुद्रीत संभाषणावरून लोकसेवक श्री. संदीप खलाटे हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही दिनांक १८/०६/२०२६ रोजी घेवुन येण्यास सांगितले त्यामुळे पुढील सापळा कारवाई ही दिनांक १८/०६/२०२६ रोजी करण्याचे ठरले.

दिनांक १८/०६/२०२६ रोजी सकाळी तक्रारदार, पंच व पोलीस पथक असे ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात आल्यानंतर मी व सपोआ मुदीराज यांनी दोन्ही पंच, तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. तद्नंतर मी, तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये रु. १०,०००/- इतकी रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पथकातील अंमलदार यांचेमार्फतीने तक्रारदार यांचेकडील लाचेची रक्कम रू.१०,०००/- (त्यामध्ये रू.५००/- दराच्या भारतीय चलनाच्या २० नोटा) यांच्या झेरॉक्स काढून त्यावर दोन्ही शासकीय पंचांची स्वाक्षरी घेण्यात आल्या. तसेच तक्रारदार यांची अंगझडती घेण्यात आली.

त्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील गोपनीय कक्षामध्ये सापळापुर्व कारवाई करण्यात आली. त्यावेळी मी व पोलीस पथकातील पोशिचा क्रमांक १९०५७२/ संतोष कदम यांनी पंच व तक्रारदार यांना अँथ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. पोशि चालक संतोष कदम याचेमार्फतीने लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रू.१०,०००/- रक्कमेच्या रु. ५०० दराच्या २० नोटा अशी लाचेची रक्कम एकत्रित करून नमुद रक्कमेस अँथ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम एकत्रित करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या डाव्या खिश्यामध्ये अलगद ठेवली. त्यानंतर मी, पंच, तक्रारदार यांना पोशि चालक संतोष कदम हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व पंच व सापळा पथकातील अंमलदार यांना योग्य त्या खबरदारीच्या सुचना दिल्या.

त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. मुंबई ठाणे दैनदिनीमध्ये नोंद घेवुन सापळा कारवाईकरीता पथकासह शासकिय वाहनाने रवाना झालो. माझगाव कोर्ट परीसरातील पार्कीग मध्ये पोहचलो. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक यांना कॉल करण्याबाबत कळविले असता, त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन लोकसेवक यांना भेटावयास येत असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक यांनी दोन मिनीटामध्ये कॉल करतो असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक यांनी तक्रारदार यांना कॉल करुन वस्तु व सेवाकर विभाग कार्यालयासमोर येतो असे सांगितले. त्यानंतर पुन्हा कॉल करून ते मिटीगमध्ये असुन सायंकाळी येण्यास सांगितले.

त्यानंतर दुपारी तक्रारदार यांना लोकसेवक यांचे मोबाईलवरुन कॉल आला. त्यांनी तक्रारदार यांना एम. टी.एन.एल. बिल्डिग, लव्हलेन या ठिकाणी बोलविले. त्यावरुन आम्ही सापळा पथकातील अंमलदार यांना आगावु एम.टी.एन.एल. बिल्डिग, लव्हलेन या ठिकाणी पाठविले. उर्वरीत पथकातील अंमलदार व आम्ही तक्रारदार यांचे सोबत एम.टी.एन.एल. बिल्डिग या ठिकाणी गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक यांना कॉल करुन एम.टी. एन.एल. बिल्डिग येथे आल्याचे सांगितले. तेव्हा लोकसेवक यांनी बिल्डिगच्या पहिल्या माळयावर येण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांचेसोबत पंच न.०१ हे इमारतीच्या पहिल्या माळयावर गेले. पहिल्या माळयावर टॉयलेटजवळ लोकसेवक हे उभे होते. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे शर्टाच्या डाव्या खिश्यातुन लाचेची रक्कम काढुन लोकसेवक यांचे समोर धरली. त्यावेळी लोकसेवक यांनी सदरची लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारली. त्यानंतर तक्रारदार यानी पुर्वनियोजीत इशारा म्हणुन त्यांचे डोळयावरील चष्मा काढुन लोकसेवकाने लाच रक्कम स्विकारल्याबाबत पुर्वनियोजीत इशारा केला.

त्यानंतर मी व सापळा पथकाने लागलीच पंचांसह लोकसेवक श्री संदीप खलाटे यांना १५.५० वा लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. सदर लोकसेवकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री. संदीप रवीराज खलाटे वय- ३८ वर्ष, व्यवसाय- नोकरी (राज्यकर निरीक्षक, वस्तु व सेवाकर विभाग, माझगाव मुंबई) राठी : तिरुपती कॉर्नर, रुम न.६०३, सेक्टर २३, उलवे, नवी मुंबई असे सांगितले.

तरी आरोपी लोकसेवक श्री. संदीप रवीराज खलाटे वय- ३८ वर्ष, व्यवसाय- नोकरी (राज्यकर निरीक्षक, वस्तु व सेवाकर विभाग, माझगाव मुंबई) राठी : तिरुपती कॉर्नर, रुम न.६०३, सेक्टर २३, उलवे, नवी मुंबई असे यांनी स्वतः करीता तक्रारदार नामे श्री अनिलकुमार यादव यांचे व्यवसायाचे जी.एस.टी. क्रमांक जनरेट केल्यानंतर त्यांचा मोबदला म्हणुन रू. १०,०००/- इतकी लाचेची मागणी करून स्विकारण्याचे दिनांक १७/०६/२०२६ रोजीच्या पडताळणीमध्ये मान्य केले. तसेच दिनांक १८/०६/२०२६ रोजी सापळा कारवाईदरम्यान आलोसे यांनी स्वतःकरीता रू. १०,०००/- इतकी लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून पंचांसमक्ष स्विकारताना रंगेहाथ पकडले, म्हणुन माझी आलोसे श्री. संदीप रवीराज खलाटे यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठित टंकलिखीत केला असुन, तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( महेश जाधव )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तक्रारदाराकडून ........
Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ रु. १०,०००/- ........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........
Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील आरोपी लोकसेवक संदिप खलारे यांनी यातील तक्रारदार अनिलकुमार यादव यांनी दस्त नंबर मिळवण्यासाठी केलेल्या अर्जाविरुद्ध तक्रारदार यांना दस्त नंबर दिल्यानंतर केलेल्या कामाचा मोबदला म्हणून रु. १०,०००/- रुपयांची लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्वतःच्या कार्यालयात स्वीकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले म्हणून त्यांचे विरुद्ध भ्र.प्र. अधिनियम १९८८ कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला

13. **केलेली कार्यवाही** -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ........ स.पो.आ. महेश जाधव, ला.प्र.वि. मुंबई पथक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ................................................

(3) Transferred to P. S. ...................................
District .................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ महेश मधुकर जाधव.
पदनाम Rank ........ स.पो.आ. ला.प्र.वि. मुंबई.
तपासिक अ. चा कोड क्र. ........
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........ १८/०६/२०२४ ........
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report